# बहुउद्देशीय ग्रामविकास सेवाभावी संस्था, अंबुलगा

## ता. देगलुर, जि. नांदेड

---

## कामकाज अहवाल

**१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र -**

संस्थेची स्थापना सन २०२१ साली झाली. ग्रामीण भागातील नागरिकांचा सर्वांगीण विकास व्हावा हा उद्देश ठेवून संस्था स्थापन करण्यात आली. मा. सहाय्यक संस्था निबंधक, नांदेड यांच्याकडे संस्था रजिस्टर्ड करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास सहाय्यक संस्था निबंधक नांदेड यांनी संस्था नोंदणी अधिनियम, १९६० (सन १९६० ते अधिनियम २१) अन्वये मान्यता देऊन दि. १० फेब्रुवारी २०२१ रोजी नोंदणी झाल्याचे प्रमाणपत्र दिले. तद्नंतर मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (सन १९५० मुंबई अधिनियम क्रमांक २९) अन्वये नांदेड येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कार्यालयात नोंदणी करण्यात आली. दिनांक १३ जानेवारी २०२३ रोजी नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानुसार सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकानुसार F-0024820(NND) हा क्रमांक देण्याक आला आहे.

**२) दत्तकगाव प्रकल्प -**

अंबुलगा हे गाव तेलंगणा आणि कर्नाटक या दोन राज्याच्या सीमेलगत आहे. गावची लोकसंख्या १३५० इतकी आहे. गावचे एकूण क्षेत्र १२५० हेक्टर इतके आहे. बागायती ७०० हेक्टर, जिरायती ३०० हेक्टर वनजमीन २५० हेक्टर इतकी आहे. गावात प्राथमिक शाळा असून इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग आहेत. गावात एक सार्वजनिक ग्रंथालय आहे. गावात पिण्याच्या पाण्यासाठी पंचायत समितीच्या निधीतून ५ हापसे बसविण्यात आले आहे. अद्‌याप नळाद्‌वारे पाणी पुरवठ्याची व्यवस्था नाही. गावापासून तालुक्याचे अंतर २२ किमी आहे. जिल्ह्याचे अंतर १०५ किमी आहे. अंबुलगा हे गाव नांदेड - बिदर हायवेपासून ६ किमी

Scanned with OKEN Scanner

अंतरावर आहे. गावात बससेवा असून देगलूर ते अंबुलगा अशी चार वेळा बस गावात येते. गावात कोणताही उद्योग व्यवसाय नसून सर्व कुटुंबे शेतीवर अंवलबून आहेत. गावात एकूण १३ बचतगट कार्यरत आहेत. गावात दिव्यांग व्यक्तींची संख्या पाच इतकी असून १ महिला आहे. दिव्यांग नागरिकांना शासनाचे अर्थसाह्य मिळत आहे. संस्थेनेही याकामी मदत केली आहे. गावात अनुसूचित जाती आणि जमाती व विमुक्त भटक्या जमातीची लोकसंख्या लक्षणीय आहे. गावात हनुमान मंदीर आहे. याच ठिकाणी गावातील सर्व कार्यक्रम पार पडतात. बँक ऑफ महाराष्ट्र शाखा माळेगाव (मक्ता) या बँकेने गाव दत्तक घेतले आहे. सदर बँक शाखा गावापासून ५ - ६ किमी अंतरावर आहे. गावातील विद्यार्थ्यांना चौथीनंतरचे शिक्षण घेण्यासाठी माळेगाव या ठिकाणी जावे लागते. त्यासाठी विद्यार्थी बसने प्रवास करतात. आठवडी बाजारासाठी नागरिकांना माळेगाव येथे जावे लागते. वनजमिनीवर वृक्षारोपण करण्यात आले असून त्यावर वनविभागाचे नियंत्रण आहे. संस्था स्थापन झाल्यापासून गावातील विविध उपक्रमांत सहभाग घेत असते. संस्थेने विविध उपक्रमही राबविलेले आहेत.

**३) हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबीर -**

संस्थेने गावात रकट्टा लॅब हणेगाव यांच्या सहकार्याने ग्रामस्थांसाठी मोफत हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन केले होते. या उपक्रमाचा लाभ ९० ग्रामस्थांनी घेतला. यामध्ये पुरूष ४४, महिला ४६ असे एकूण ९० ग्रामस्थांनी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी करून घेतले आहे. १० ग्रॅमपेक्षा कमी हिमोग्लोबीन असलेले फक्त १० ग्रामस्थ होते. फारच कमी हिमोग्लोबीन असलेले फक्त ६ ग्रामस्थ होते. संस्थेच्या कार्यालयात सदर रेकॉर्ड ठेवण्यात आले आहे.

**४) महिला स्वयंम सहाय्यता बचत गट -**

गावात संस्थेच्या व पंचायत समितीच्या पुढाकाराने स्वयंम सहाय्यता बचत गटाची स्थापना करण्यात आली असून आजमितीला ही संख्या १३ इतकी झाली आहे. सर्व बचतगट उत्तमरित्या कार्यरत असून बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेने उत्तम सहकार्य केले आहे. सर्व बचतगटातील महिलांनी बँक सेव्हिंग खाते उघडले असून आर्थिक व्यवहाराचे शिक्षण उत्तमरित्या मिळत आहे. त्यामुळे आर्थिक साक्षरताही चांगलीच वाढली आहे. देगलूर पंचायत

Scanned with OKEN Scanner

समितीने प्रत्येक गटाला रू. ३०,००० खेळते भांडवल म्हणून दिले आहे. तद्नंतर प्रत्येक गटाला बँकेने ३,००,००० रूपये इतके भांडवल मंजुर केले आहे. त्यामुळे महिलामध्ये आर्थिक बाबतीत चांगलीच जागृती निर्माण झाली आहे. यापुढील काळात बचतगटाला काही व्यवसाय करता येईल का यासाठी प्रयत्न चालू आहे. पंचायत समितीचे बचतगटाचे म्हणजे 'उमेदचे' काम पाहणारे अधिकारी श्री. चव्हाण साहेब हे गावामध्ये येवून सर्व बचतगटाच्या महिलांना मार्गदर्शन केले. बचत गटाची गरज काय आहे हे पटवून दिले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. इंद्रजित जाधव हेही उपस्थित राहून बचत गटाचे फायदे काय आहेत हे समजावून सांगितले.

**५) ध्वजारोहन कार्यक्रम -**

ग्रामपंचायत कार्यालय, सहकारी सोसायटी, प्राथमिक शाळा व बहुउद्देशिय ग्रामविकास सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट व २६ जानेवारी अनुक्रमे स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिनी गावात फेरी काढून साजरा केला जातो. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य आवर्जुन उपस्थित असतात. वरील दोन्ही राष्ट्रीय सणांच्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने खाऊ वाटपाचा कार्यक्रम ठेवला जातो.

**६) अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रम -**

आजच्या २१ व्या शतकातही खेड्या - पाड्यात अंधश्रध्दांचा प्रभाव दिसून येतो. अंधश्रध्दांचा फायदा घेवून कधी लुबाडणुकही होते. अंधश्रध्दांना बळी पडू नये म्हणून ग्रामस्थांचे उत्तम प्रबोधन व्हावे म्हणून ग्रामस्थांसाठी श्री. नवनाथ लोंढे, अंधश्रध्दा निर्मुलन समिती पुणे यांचे सहप्रयोग व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री. नवनाथ लोंढे यांनी अनेक जादुचे प्रयोग करून दाखवले व त्याचा उलगडा करून सांगितले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये मोठीच जागृती निर्माण झाली. लहान मुलांनीही अतिशय उत्सुकतेने कार्यक्रमामध्ये भाग घेवून अंधश्रध्देमुळे माणूस कसा फसला जातो हे जाणून घेतले. कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. इंद्रजित भाऊराव जाधव हे होते. माजी सरपंच खुशालराव बोंडगे व अड. अंकुश जाधव हेही उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

### ७) ज्येष्ठाचा सत्कार -

गावातील ज्येष्ठ नागरिक हे अनुभव संपन्न संपत्ती आहे. याची जाणीव ठेवून संस्थेच्या वतीने गावातील ज्येष्ठ नागरिकांचा हार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. गावातील विकासाच्या कामात ज्येष्ठांचाही सहभाग असतो. गावचे नेतृत्व करणाऱ्यास ज्येष्ठांचे अनुभव व मार्गदर्शन असल्यास विधायक कामास गती मिळते. गावातील ज्येष्ठांनीही या कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला आहे. गावात ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्याचा संस्थेचा मानस आहे.

### ८) मोफत आरोग्य तपासणी शिबीर -

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक दिनानिमित्त नांदेड येथील सुप्रसिध्द संजीवनी हॉस्पीटल आणि हणेगाव येथील मेनकाई हॉस्पीटल यांच्या वतीने गावात भव्य मोफत आरोग्य तपासणी व औषधं वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला ग्रामस्थांनी उत्तम प्रतिसाद दिला. या शिबीरात एकूण ११४ नागरिकांनी तपासणी करून घेतली. डॉ. रेहाण गोविंद पाटील, हणेगाव या डॉक्टरांनी उपस्थित ग्रामस्थांना आरोग्यविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अड. अंकुशराजे जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. ईश्वर बोंडगे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत अंबुलगाव व बहुउद्देशिय ग्रामविकास सेवाभावी संस्था यांच्या विद्यमाने करण्यात आले.

### ९) गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ -

दरवर्षी इयत्ता १० वी व १२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव समारंभ संस्थेच्या वतीने आयोजित केला जातो. या विद्यार्थ्यांना फाईल, पेन, वाचनीय पुस्तक व रोख रक्कमेचे बक्षीस दिले जाते. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वर्षीच्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मरखेल पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. रविकांत हुंडेकर साहेब हे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले. संस्थेने व ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. इंद्रजीत जाधव हे होते. या कार्यक्रमाचे वेळी गंगाई फाऊंडेशनच्या वतीने श्री. गोरखनाथ बाचिपळे यांनी इयत्ता १० वी मध्ये ९७ टक्के

Scanned with OKEN Scanner

गुण घेवून यश संपादन करणाऱ्या कु. संजीवनी गोविंद भुताळे हिला रू. २१००/- चे रोख बक्षीस दिले. या कार्यक्रमास सरपंच व संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अड. अंकुशराजे जाधव यांनी केले.

**१०) माती परिक्षण कार्यशाळा व विशेष मार्गदर्शन -**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना बी - बीयाणे, खते, औषधे, सेंद्रीय खते याविषयी वेळोवेळी मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीमध्ये व कमी खर्चात जास्त उत्पन्न यामध्ये माती परिक्षणाचे महत्व अधिक आहे. संस्थेने यासंदर्भात शेतकऱ्यांमध्ये जाणीव - जागृती निर्माण करण्यासाठी शहापुर, ता. देगलूर येथील माती परिक्षण तज्ञ श्री. अशोक बारसनवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. बारसनवार यांनी शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील माती तपासून घेणे किती गरजेचे आहे. त्यामुळे खताचा खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ कशी होते हे पटवून दिले. त्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

सह्याद्री फार्म नाशिक येथील अधिकारी श्री. कैलास सावंत साहेब यांनी शेतकऱ्यांना पारंपारिक पिकाबरोबर बागायती पिके घेतली तर सह्याद्री फार्म आपणांस मार्गदर्शन करेल. लिंबू, संत्रा, मोसंबी यासारख्या बागा शेतकऱ्यांनी केल्यास व शेतकऱ्यांना जास्त उत्पादन मिळेल यासाठी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासही शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. ग्रामस्थांनी बहुउद्देशीय ग्रामविकास सेवाभावी संस्थेने असे चांगले उपक्रम राबविल्यास शेतकऱ्यांचा ज्ञानात भर पडेल अशा भावना व्यक्त केल्या. उपस्थितांचे आभार शेतीनिष्ठ शेतकरी श्री. आत्माराम देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले.

**११) भारताच्या संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन -**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक दिनाच्या दिवशी हा विशेष उपक्रम घेण्यांत आला. ग्रामपंचायत अंबुलगा व बहुउद्देशीय ग्रामविकास सेवाभावी संस्थेच्या वतीने विशेषत: अ.जाती व अनु. जमाती आणि इतर मागासवर्ग या कुटुंबातील प्रमुखांना शासनाच्या

उपक्रमानुसार भारताच्या उद्देश पत्रिकेच्या फोटो फ्रेम प्रतींचे मान्यवरांचे हस्ते वाटप करण्यात आले. घरोघरी संविधानाची उद्देश पत्रिका हा उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी अड. अंकुश जाधव यांनी उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन करून घेतले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. इंद्रजित जाधव यांनी उद्देशपत्रिकेचा अर्थ समजावून सांगितला. ग्रामपंचायतीचे सरपंच सौ. केवळाबाई प्रकाश बोंडगे व उपसरपंच सौ. सरस्वती अंकुशराजे जाधव व संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१२) योग, प्राणायाम व ध्यान शिबीर -**

आर्ट ऑफ लिव्हिंग, देगलुर व बहुउद्देशीय ग्रामविकास सेवाभावी संस्था आणि ग्रामपंचायत अंबुलगा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ते २७ मे २०२६ या कालावधीत योग, प्राणायाम व ध्यान शिबीराचे आयोजन ग्रामस्थांसाठी केले होते. योग गुरू श्री. प्रा. मानधना सर देगलूर यांनी तीन दिवस शिबीरार्थींना उत्तम मार्गदर्शन केले. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात योग, प्राणायाम आणि ध्यान उत्तम आरोग्यासाठी किती आवश्यक आहे हे प्रात्यक्षिकांद्वारे पटवून दिले. प्रत्येकांनी तणावमुक्त जीवन जगण्यासाठी व उत्तम आरोग्यासाठी दिवसातील आपला थोडा वेळ देऊन योग, ध्यान व प्राणायाम केल्यास निश्चित आरोग्य लाभेल असे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. मानधना सर यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमालाही ग्रामातील स्त्री - पुरूष व तरूणांनी चांगला प्रतिसाद दिला.

**१३) जागतिक महिला दिन -**

अंबुलगा येथे दरवर्षी ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून सांजरा केला जातो. यामध्ये महिला स्वयंसहाय्यता गटाचा मोठा सहभाग असतो. यादिवशी गावातील सर्व महिला एकत्र याव्यात व आनंद व्यक्त करावेत आणि विविध उपक्रमात सहभाग घ्यावा म्हणून हळदी - कुंकु कार्यक्रम, संगीत-खुर्ची, लिंबू-चमचा रेस इत्यादी उपक्रम राबविले जातात व त्यादिवशी महिलासाठी एका विशेष व्याख्यानाचे आयोजन केले जाते.

Scanned with OKEN Scanner

१४) विविध उत्सव व जयंती साजरी -

गावामध्ये गणेशोत्सव, शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा गांधी जयंती, संत तुकाराम महाराज बीज, संत गोरोबा काका पुण्यतिथी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, विजयादशमी, रामनवमी, हनुमान जयंती इ. विविध जयंती व पुण्यतिथी व उत्सव गावामध्ये साजरे केले जातात. त्यामुळे गावातील वातावरण एकोप्याचे राहून ग्रामविकासास पुरक असे वातावरण राहण्यास मदत होते.

वरीलप्रमाणे बहुउद्देशीय ग्रामविकास सेवाभावी संस्थेने विविध उपक्रम राबवून गावच्या विकासात भर घातली आहे. ग्रामपंचायत, महिला स्वयंम सहाय्यता गट व संस्था हे एकत्रित काम करीत असल्यामुळे ग्रामविकासाला चालना मिळत आहे. भविष्य काळात आपल्याच गावात नव्हे तर परिसरातील गावातही विविध उपक्रम राबवून कार्यक्रमाचा विस्तार केला जाणार आहे. अनेक शासकीय योजनांचा लाभ ग्रामस्थांनी मिळून देण्याच्या संदर्भात अधिक कामकाज संस्था करणार आहे.

------------------------******------------------------

अध्यक्ष
बहुउद्येशीय ग्रामविकास सेवाभावी संस्था
आंबुलगा,ता.देगलूर,जि.नांदेड.

बहुउद्देशीय ग्रामविकास सेवाभावी संस्था
रा.न.क्र. नांदेड 0000068/2021
F-0 4820 (N.D)
आंबुलगा,ता.देगलूर,जि.नांदेड 431718